**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य घटनेच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत विशेष चर्चेला सुरुवात
- विमानतळांवर लवकरच उडाण यात्री कॅफेमध्ये परवडणाऱ्या किमतीत अन्न पदार्थांची विक्री होणार
- चित्रपट अभिनेता अल्लू अर्जूनला हैदराबाद उच्च न्यायालयाकडून चार आठवड्यांचा हंगामी जामीन
- फ्रान्सचे नवे प्रधानमंत्री म्हणून फ्रान्स्वा बाऊरो यांची नेमणूक

**आणि**

- बॉर्डर गावस्कर चषक मालिकेतला तिसरा सामना उद्यापासून ब्रिस्बेनमध्ये

**<><><><><>**

देशानं राज्यघटना स्वीकारल्याच्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून विशेष चर्चा सुरु झाली. भारतीय संविधानानं सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक असे सर्व पैलू विचारात घेऊन राष्ट्रउभारणीसाठी मार्ग मोकळा करून दिला, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी या चर्चेला सुरुवात करताना सांगितलं. संविधान सभेनं तयार केलेलं संविधान हे केवळ अधिकृत दस्तऐवज नव्हे तर ती लोकांच्या इच्छेची अभिव्यक्ती होती, असं ते म्हणाले. संविधान ही काही एका पक्षाची देणगी नसून काही पक्ष त्याचं श्रेय स्वतःकडे घेऊ पाहत आहेत, अशी टीका त्यांनी यावेळी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार, सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास या मूलमंत्रानुसार आणि संविधानात अभिप्रेत

असलेल्या तत्त्वांनुसार कार्य करत आहे. आपलं संविधान प्रगतीशील, सर्वसमावेशक आणि परिवर्तनशील आहे, गरीब कुटुंबात जन्म घेतलेली व्यक्ती देखील आज देशाच्या उच्च पदावर जाऊ शकते ही संविधानाची ताकद आहे, असं त्यांनी सांगितलं.

संविधान हे नागरिकांचं सुरक्षा कवच असून ते न्याय, ऐक्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं कवच आहे, असं काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनी या चर्चेदरम्यान सांगितलं. सत्ताधारी या सुरक्षा कवचाला भेदण्याचं काम करत आहेत तसंच खाजगीकरणाच्या माध्यमातून सरकार आरक्षणाला कमकुवत करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

तर संविधान हा लोकशाहीचा आत्मा आहे, असं समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी सांगितलं. तर तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी गेल्या दहा वर्षात देशाची धर्मनिरपेक्ष वीण उसवत चालल्याची टीका केली.

संयुक्त जनता दलाचे नेते केंद्रीय मंत्री राजीवरंजन ऊर्फ लल्लनसिंह यांनी यावेळी बोलतांना, संविधानामुळे समाजाच्या सर्वच घटकांसाठी सामाजिक तसंच आर्थिक प्रगतीच्या कक्षा रुंदावतात, असं सांगितलं. आणीबाणी लागू करणं तसंच परिच्छेद ३५६ चा दुरुपयोग करण्याबद्दल त्यांनी काँग्रेसवर टीका केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी बेरोजगारी आणि केंद्रीय तपास यंत्रणांच्या गैरवापरचा मुद्दा यावेळी उपस्थित केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे म्हणाले, संविधानामुळं भारत सातत्यानं विकासाच्या वाटेवर आहे. इतरही खासदारांनी या चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

राज्यसभेत आजही अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावरच्या अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून प्रचंड गदारोळ झाल्यानं कामकाज सोमवार सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं. गेल्या तीस वर्षात आणि आपल्या कार्यकाळात

राज्यसभेच्या अध्यक्षांच्याविरोधात अशा किती नोटीस आल्या आहेत ते सभागृहासमोर यावं असं धनखड म्हणाले.

<><><><><>

राष्ट्रीय धोरणात्मक योजनांच्या अंमलबजावणीमुळे देशात क्षयरोग ग्रस्तांच्या संख्येत झपाट्याने घट झाली आहे. पुढच्या वर्षापर्यंत देशभरातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन करण्याचं लक्ष्य आहे, असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाल्या. भारतात २०१५मध्ये क्षयरुग्णांच प्रमाण दर एक लाखामागे २३७ इतकं होतं. हे प्रमाण २०२३मध्ये दर एक लाखामागे १९५ इतकं घटलं आहे. तसंच, २०१५मध्ये क्षयरोगाने मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या दर एक लाखामागे २८ इतकी होती. ती घटून आता २२वर आल्याची माहितीही पटेल यांनी दिली.

<><><><><>

देशभरात राबवलेल्या जनजागृती मोहिमांमुळं देशात अवयव दानासह उती दानाचं तसंच अवयव प्रत्यारोपणाचं प्रमाण वाढलं असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाचं लेखी उत्तर देताना सांगितलं. २०१८ दरम्यान ६ हजार २९४ इतकी असलेली अवयव दात्यांची संख्या २०२३ पर्यंत १६ हजार ५४२ पर्यंत पोचली आहे. या कालावधीत अवयव प्रत्यारोपणाची संख्या ७ हजाराहून १८ हजारापर्यंत वाढली आहे.

<><><><><>

केंद्रसरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गेल्या दहा वर्षात पाकिस्तानच्या कारागृहात खितपत पडलेल्या २ हजार ६३९ भारतीय मच्छीमारांची सुटका करण्यात आली आहे, अशी माहिती परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. पाकिस्ताननं यावर्षी २११ भारतीयांना ताब्यात घेतल्याची कबुली दिली आहे, त्यापैकी २४ जण दमण आणि

दीवमधले मच्छिमार आहेत.या सर्वांची लवकरात लवकर सुटका करून त्यांना जलद मायदेशी रवाना करण्याची कार्यवाही करावी असं पाकिस्तान सरकारला सांगितल्याचं जयशंकर म्हणाले.

**<><><><><>**

संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला आज २३ वर्ष पूर्ण झाली. १३ डिसेंबर २००१ रोजी पाकिस्तानातून आलेल्या पाच दहशतवाद्यांनी संसद भवन परिसरात घुसून गोळीबार केला होता. संसदेचं रक्षण करताना वीरमरण आलेले सुरक्षा रक्षक आणि प्राण गमावलेल्यांना आज देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात आली.

यानिमित्त संसद भवनात आज उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय मंत्रिमंडळातले मंत्री, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पुष्पांजली अर्पण केली. यावेळी हल्ल्यात शाहिद झालेल्यांचे कुटुंबीय देखील उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रयागराज इथे पुढच्या वर्षी होणारा महाकुंभ २०२५ हा महोत्सव देशाला मार्गदर्शन करणारा आणि जगभरात वंदनीय ठरेल, असा एकता आणि समतेचा महायज्ञ असेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साडे ५ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन, पायाभरणी आणि लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी झालेल्या प्रकल्पांमध्ये १० नवीन पूल, उड्डाणपूल, कायमस्वरूपी घाट आणि नदीसमोरच्या रस्त्यांचं  बांधकाम या विकासकामांचा समावेश आहे.  भारद्वाज आश्रम कॉरिडॉर, शृंगवरपूर धाम कॉरिडॉर, अक्षयवत कॉरिडॉर, हनुमान मंदिर कॉरिडॉर यासह प्रमुख मंदिर कॉरिडॉरचं उद्घाटनही यावेळी प्रधानमंत्र्यांनी केलं. तसंच, प्रक्रिया न केलेलं सांडपाणी गंगेत

वाहून जाण्यापासून रोखण्याच्या उद्देशानं तयार केलेल्या एका प्रकल्पाचं लोकार्पणही त्यांच्या हस्ते झालं. कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्यांसाठी वेळापत्रक, सोयीसुविधा यांविषयी मार्गदर्शन करणाऱ्या चॅटबॉटचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. याविषयी प्रधानमंत्री म्हणाले...

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

**<><><><><>**

उडाण योजनेअंतर्गत प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी सरकारतर्फे लवकरच विमानतळांवर उडाण यात्री कॅफे सुरू करण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री के.आर. राममोहन नायडू यांनी दिली. या कॅफेमध्ये प्रवाशांना परवडणाऱ्या किमतीत अन्न पदार्थांची विक्री करण्यात येईल. कोलकता विमानतळावर प्रायोगिक तत्त्वावर पहिला कॅफे सुरू करण्यात येईल, त्यानंतर देशभरातील अन्य विमानतळांवर सुरू केला जाईल, असंही नायडू यांनी या वेळी सांगितलं.

**<><><><><>**

चित्रपट अभिनेता अल्लू अर्जूनला हैदराबाद उच्च न्यायालयानं चार आठवड्यांचा हंगामी जामीन मंजूर केला आहे. हैदराबादमधे चित्रपटाच्या प्रिमिअरच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी आज त्याला अटक झाली होती.

अल्लू अर्जूनला अटक केल्यानंतर पोलिसांनी त्याला स्थानिक न्यायालयात हजर केलं होतं. न्यायालयानं त्याला १४ दिवसांची रिमांड दिली होती. हा गुन्हा रद्द करावा, यासाठी अर्जूननं लगेच उच्च न्यायालयात धाव घेतली. त्याच्या अर्जाची सुनावणी करताना उच्च न्यायालयानं ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर त्याला हंगामी जामीन मंजूर केला.

**<><><><><>**

फ्रान्सचे अध्यक्ष एमॅन्यूल मॅक्रॉन यांनी फ्रान्स्वा बाऊरो यांची नवे प्रधानमंत्री म्हणून नेमणूक केली. त्यांच्यासमोर सरकारला स्थिरता देणं आणि अर्थसंकल्प मंजूर करणं हे दोन आव्हानं आहेत. त्या आधीचे प्रधानमंत्री मायकल बार्नियर यांना अविश्वास दर्शक ठरावाद्वारे हटवलं होतं. फ्रान्सच्या इतिहासात सर्वात कमी काळ म्हणजे केवळ ३ महिने ते प्रधानमंत्री पदावर होते.

**<><><><><>**

बॉर्डर गावस्कर चषक मालिकेतला तिसरा सामना उद्यापासून ब्रिस्बेनमध्ये गब्बा इथं सुरू होणार आहे.

**//<><><><><>//**